# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**सायंकाळ**

---

**दिनांक २५.०१.२०२३ बुधवार**

**( कामगीरी )**

**गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ यांची कामगीरी**

दि. २५.०१.२०२३ चे ०२.३० वा. चे सुमारास गुन्हेशाखा पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत शिवणकर नगर, ताजुलवार मस्जीदजवळ राहणारी आरोपी शहनाज बानो उर्फ सोनी शेख ईसराईल वय ४८ वर्ष हिचे राहते घरून तिचे ताब्यातुन अवैधरित्या विक्री करीता साठवुण ठेवलेला मुद्देमाल १) १८० एम.एल. च्या काचेच्या सिलबंद देशी दारू, भिंगरी संत्रा नंबर १, कंपणीच्या एकुण ७२० बॉटल प्रत्येकी किंमत ७०/—रू प्रमाणे एकुण कि. ५०,४००/—रू, व २) विवो कंपनीचा मोबाईल कि. १०,०००/— रू असा एकुण ६०,४००/—रू चा मुद्येमाल मिळुण आल्याने जप्त करण्यात आला. पो. ठाणे नंदनवन येथे कलम ६५ (अ)(ई), ८२, ८३ म. दा. का. अन्वये आरोपी महीलेविरूद्ध कार्यवाही करून गुन्हा नोंद करण्यात आला.

वरील कामगीरी पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), श्री राहुल मदने (प्रभारी ), मा. सहा. पो.आयुक्त (गुन्हे) श्री. रोशन पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली पोनि.सौ. शुभांगी देशमुख, सपोनि राजेन्द्र गुप्ता, पोहवा संजय सोनावने, प्रदीप पवार, नापोअं. सुनित गुजर, शरद चांभारे, हेमंत लोणारे, सुशांत सोळंके, सुशिल श्रीवास, चंद्रशेखर भारती अजय शुक्ला, योगेश सातपुते व पोअं. रवि राउत, नितीन बोपुलवार यांनी केली.



**( गुन्हे )**

**१) पोलीस ठाणे जुनि कामठी : — फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक ०१.११.२०१७ ते दि. ३१.०३.२०२० दरम्यान पो. ठाणे जुनी कामठी हद्दीतील निर्मल अर्बन को ऑपरेटीव बॅक, शाखा जुनि कामठी येथुन फिर्यादी रईसउल्लाह आदील मुमताज अहमद वय ६० वर्ष रा. बुनकर कॉलनी, येरखेडा यांनी नोव्हेंबर २०१७ मध्ये ६ लाख रूपये होम लोन व ६ लाख रूपये कॅश क्रिडीट लोन घेतले होते. फिर्यादीला बॅकेतुन चेकबुक ईश्यु करून त्यातील १७ कोरे चेकवर फिर्यादीची सही घेवुन बॅक मॅनेजर आरोपी क्र. ०१) सचिन प्रकाशराव बोंमले वय ४२ वर्ष रा. प्लॉ. नं. १०४, शततारका अपार्टमेंन्ट, सुरेंद्र नगर यांनी आपले जवळ ठेवुन घेतले होते. असि. मॅनेजर आरोपी २) शैलेष भरतलाल कोचनकर वय ४३ वर्ष रा. प्लॉ. नं. २०१, विश्राम नगर,

नारा रोड ३) प्रमोद नथ्थुजी मानमोडे वय ५७ वर्ष, रा. प्ला. नं. २१८, निर्मल गंगा अपार्टमेंट, नंदनवन यांनी संगणमत करून आपसात कट रचुन फिर्यादीचे बाबा रेडीमेड या नावाने बॅकेत असलेल्या कॅश क्रेडीट लोन खात्याची कॅश लिमीट ६ लाख वरून वाढवुन ती ६० लाख रूपये नेवुन फिर्यादीकडुन घेतलेले सही चे कोऱ्या चेक चा वापर करून बेकायदेशिरपणे व्यवहार केले. फिर्यादीने वेळोवेळी कॅश क्रेडीट लोन खात्यात दरमहा भरणाकरीता दिलेले ४,५०,०००/रू पैकी आरोपींनी १,८८,७५०/रू बॅकेत खात्यात भरले व उर्वरित २,६१,२५०/रू बॅकेत फिर्यादीचे खात्यात न भरता फिर्यादीची आर्थीक फसवणुक केली. आरोपींनी फिर्यादीचे कॅश क्रेडीत लिमीट खात्याची मर्यादा बेकायदेशिर रित्या ६० लाख पर्यंत वाढवुन फसवणुक केली व फिर्यादीचे आर्थिक पत अवमुल्यंन केल्याने त्यांच्या सिव्हिल स्कोरवर त्याचा विपरित परिणाम झाला. आरोपींनी कामठी शाखेतील ईतर खातेदारांची अशाच प्रकारे लिमीट वाढवुन व एफ. डी. मोडुन अफरातफर केली आहे. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या रिपोर्टवरून व चौकशीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि दुबाले ८८०५९२०८०० यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०,४०९,४०६,१२०(ब), भा.दं. वि. अन्वये गुन्हा नोंदविला असुन पुढील तपास आर्थिक गुन्हेशाखा करीत आहे.

**( अकस्मात मृत्यु )**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर :</u> —** दिनांक २४.०१.२०२३ चे २३.०० वा. चे सुमारास पो.ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट न. ०९, अयोध्या नगर येथे राहणारी कु. दिव्या कृष्णराव सोलव वय २६ वर्ष हिने अज्ञात कारणावरून राहते घरी रूममध्ये छताचे लोखंडी कडीला ओढणीचे सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या केली

याप्रकरणी फिर्यादी अमित विलास कुबडे वय २९ वर्ष रा. बेसा यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि पवार ८०५५५२४५९७ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**(मिसींग)**

**<u>१) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :</u>—** कु. पुजा शिवकुमार मालनी वय १८ वर्ष रा. गेडाम ले—आउट हिंगणा रोड एम.आय.डी.सी., नागपुर ही दि. २०.०१.२०२३ चे १३.०० वा. सुमारास पो.ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीतुन राहते घरी काहीही न सांगता निघुन गेली, परत आली नाही, मिसींग आहे, बेपत्ता आहे. शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** — रंग —गोरा, चेहरा — लांब, बांधा —सडपातळ, केस — काळे, उंची— ५ फुट २ इंच, अंगात— जामुनी रंगाचा कुर्ता व काळी लॅगीन घातलेली आहे. भाषा— हिंदी/ बोलते. व ओळख—उजवे गालावर तिळ आहे.



कु. पुजा मालनी

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्रं. व कलम मधील खालील नमुद आरोपी हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. आरोपींनी नमुद तारखे पर्यंत न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ क्र | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सह दिवानी न्यायाधिश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०१२२७३ /२००६ | ३,४,६,८, पिटा ॲक्ट | **१)** जिजाबाई उर्फ गुड्डी संजय मेश्राम<br>**२)** सौ. अंजु अजीज रेड्डी दोन्ही रा. व्यंकटेश नगर, एन.आय.टी. कॉलनी, बि. /११६, नंदनवन, नागपुर<br>**३)** सौ. गिता कृष्णा कुंभारे रा. भांडे प्लाट झोपडपट्टी, शंकरशाही मठाजवळ, सक्करदरा, नागपुर<br>**४)** शिवा सोनबा मेश्राम रा. बिना, तहसिल कामठी, पो.स्टे. खापरखेडा, नागपुर | ०४.०२.२०२३ |
| २. | मा. १६ वे सह दिवानी न्यायाधिश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०४१२५/ २००९ | ३२४, ४४७, ४५२, ३४ भा.दं.वि. | अब्दुल रशीद अब्दुल रज्जाक रा. शांतीनगर, मुदलियार ले—आउट, नागपुर | १४.०२.२०२३ |

**( उमेश नासरे)**
सहा. पोलीस निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर.